अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

स्थापना : १९८६

Buldana Urban
Co-op. Credit Society Ltd., Buldana
R.No.267 (Multistate)

बुलडाणा अर्बन
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलडाणा
र.नं.२६७ (मल्टीस्टेट)

Email : buldanaurban@rediffmail.com
www.buldanaurban.co.in

**सोने तारण कर्ज**
- अल्प व्याजदरात सोने व चांदी तारण कर्ज अल्प वेळेत उपलब्ध.

**संस्थेची आर्थिक स्थिती**
- एकूण ठेवी - १५०४५ कोटी
- एकूण कर्ज वाटप - ११११०४ कोटी
- सोने तारण कर्ज वाटप - ४३५५ कोटी
- एकूण सभासद - १६,०५,८४१
- एकूण शाखा सर्व संगणकीकृत - ४७८
- एकूण गोदाम - ४०५

**ठेवीवर आकर्षक व्याजदर**
**द.सा.द.से.९%, ज्येष्ठ नागरिक ९.५%**
संपर्क रिजनल मॅनेजर :
श्री. विलास गजानन कंकाळ मो.नं.९०११२७५५५१

विभागातील नियोजीत शाखा - मोहोळ, अक्कलकोट, जुळे सोलापूर, अकलुज, सांगोला, मंगळवेढा, भूम, परांडा.

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ । वर्ष : २४ वे । अंक : १२३ वा । किंमत : ५ रुपये । पाने १२

# MADAM Dy.CM.

## राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

## सुनेत्राताईंचा आज शपथविधी




✔ बारामती-मुंबई

**अजित पवार यांच्या अकाली निधनाने रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या गट नेतेपदी सुनेत्रा पवार यांची शनिवारी निवड केली जाणार आहे. त्यानंतर त्यांचा उपमुख्यमंत्रीपदाचा शपथविधीचा सोहळा सायंकाळी पाच वाजता राजभवनात पार पडेल, अशी अत्यंत खात्रीलायक माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड करण्यासाठी आज शनिवारी आमदारांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड केली जाईल. राष्ट्रवादीच्यावतीने लगेचच मुख्यमंत्र्यांकडे निवडीचे पत्र दिले जाणार आहे. त्यानंतर पवार यांचा शपथविधी पार पडण्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार यांचा शपथविधी लगेचच पार पडेल, असे समजते. अर्थात, राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या नियोजित कार्यक्रमावर ते अवलंबून असेल, अशीदेखील माहिती पुढे आली आहे.**

दरम्यान सुनेत्रा पवार यांचा राज्य मंत्रिमंडळात लगेचच समावेश करण्यात येणार आहे. हा शपथविधीचा समारंभ अत्यंत साधेपणाने पार पाडला जाईल. सुनेत्रा पवार या राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री म्हणून विराजमान होतील.

खासदार सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या गटनेत्या आणि उपमुख्यमंत्री पदावर निवड करण्याच्या पार्श्वभूमीवर, शुक्रवार (ता.३०) बारामती आणि मुंबईत मोठ्या घडामोडी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटात घडल्या. या पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. तेव्हा पक्षाच्यावतीने सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांना देण्यात आली.

### राष्ट्रवादीच्या 'एकीचा' चेंडू शरद पवारांच्या कोर्टात!



विद्या प्रतिष्ठानमध्ये अजित पवार यांना अखेरचा निरोप देण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी पहिल्यांदा सुनेत्रा पवार आणि त्यानंतर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएमधून अजित पवार बाहेर पडणार का? तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत जुळवून घेणार का? याची चर्चा सुरू असतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं बारामतीमध्ये बुधवारी अत्यंत धकादायकरित्या भीषण विमान अपघातामध्ये निधन झालं. त्यामुळे राष्ट्रवादीच्या नेतृत्वात पोकळी तयार झाली असून आता भविष्यामध्ये कोणत्या पद्धतीने निर्णय घ्यायचा यावर निर्णय येऊन ठेपला आहे. अजित पवार यांचं राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एकहाती नेतृत्व असल्याने दुसऱ्या फळीतील नेते जरी असले तर ते त्यांची बरोबरी करू शकणारं कोणीच नसल्याने आता राष्ट्रवादीमध्ये नेतृत्व करायचं तरी कोणी हा प्रश्न उभा राहिला आहे.

### पवार कुटुंबीय एकत्रित बसून निर्णय घेण्याची शक्यता

दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या नेतृत्वामध्ये सुद्धा मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित करायची चर्चा सुरू असतानाच अजित पवार यांच्या जाण्यानं आता पवार कुटुंब एकत्रित बसून याबाबत अंतिम निर्णय करणार असल्याची माहिती समोर आली आहे. दोन्ही पक्ष विलीनीकरणासाठी आज किंवा उद्या पवार कुटुंबीय एकत्रित बसून निर्णय घेण्याची शक्यता असल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, हा सर्वस्वी निर्णय आता शरद पवार यांच्याच कोर्टात गेला असून ते याबाबतीत अंतिम निर्णय घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून केवळ अजित पवार हे चर्चेमध्ये सहभागी होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून खासदार सुप्रिया सुळे, स्वतः शरद पवार, जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, शशिकांत शिंदे हे सहभागी होते.

### सुनेत्रा वहिनींच्या पाठीमागे उभे राहण्याचा एकमुखी निर्णय



आमदार माणिकराव कोकाटे यांनी देखील म्हटलं आहे की, सर्वांची एकच इच्छा आहे, की सुनेत्रा पवार यांनाच उपमुख्यमंत्री करावं. त्यासाठी आमच्या आमदारांची बैठक घेण्याची गरज नाही. राष्ट्रीय अध्यक्ष देखील सुनेत्रा पवार यांना करावे, पक्षाची धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे द्यावी. मी अनेक आमदारांशी बोललो, सर्वांचं एकमुखी म्हणणं की सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी उभे राहायला हवं. आम्ही एका मताने ठराव करणार आहोत. सुनेत्रा वहिनींनी आमचं, पक्षाचं नेतृत्व करावं. दादांची खाती देखील त्यांनी सांभाळावी असं कोकाटे यांचे म्हणणे आहे. यासाठी एकमुखाने आम्ही ठराव करणार आहोत. आम्ही दोन पत्र तयार करणार आहोत, एक पक्ष आणि निवडणूक आयोगाला देणार आहोत. आम्ही एकमुखाने सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी आहोत, त्यांच्याकडेच पक्षाचे नेतृत्व देणार असल्याचं कोकाटेंनी स्पष्ट केलं.

### सुनेत्रा पवारांनी साधला संवाद, शुक्रवारच्या बैठकीत सगळंच झालं फायनल

अजित पवारांच्या अस्थी विसर्जनाचा कार्यक्रम झाल्यानंतर व्हिडीओ कॉन्फरंसिंगच्या माध्यमातून सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादीच्या इतर पाच बड्या नेत्यांची बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय झाल्याची माहिती आहे. राष्ट्रवादीने घेतलेल्या या निर्णयाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली जाणार आहे. त्यानुसार शनिवारी संध्याकाळी पाच वाजता सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी होईल दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यामध्ये बंद दाराआड तब्बल ४५ मिनिटांहून अधिक चर्चा झाल्याची माहिती आहे. अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसला एकसंध बांधण्यासाठी पवार कुटुंबीयांमधील कुणाकडे तरी पक्षाची धुरा असावी असं मत भाजपच्या नेतृत्वाचं असल्याची माहिती आहे. त्यामुळेच पक्षप्रमुख म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची देखील माहिती आहे.

### राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घेतली भेट



गुरुवारी बारामतीमध्ये विद्या प्रतिष्ठानमध्ये अजित पवार यांना अखेरचा निरोप देण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी पहिल्यांदा सुनेत्रा पवार आणि त्यानंतर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमध्ये प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल आणि माजी मंत्री धनंजय मुंडेही बैठकीला उपस्थित होते. यावेळी अजित पवार यांच्याकडे असलेली खाती ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळावी, अशी चर्चा या बैठकीमध्ये करण्यात आली. अजित पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासह उत्पादन शुल्क, क्रीडा खातं आणि महत्त्वपूर्ण अर्थ खातं होतं. त्यामुळे आता ही खाती आपल्याकडेच राहावीत यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यासंदर्भात दुपारी माध्यमांशी बोलण्याची शक्यता आहे. पुण्याच्या पालकत्व अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडेच ठेवावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांकडे व्यक्त करण्यात आल्याचे समजते.

### पुढील रणनीती ठरवण्यासाठी सल्लागार नरेश अरोरांनी घेतली पवार कुटुंबाची भेट

**म्हणाले, योग्य वेळी विलिनीकरणाचा निर्णय सार्वजिक करु !**

सल्लागार नरेश अरोरा यांनी बारामतीला भेट दिली, जिथे त्यांनी अजित पवार यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीचा मुख्य उद्देश सांत्वन करणे हा होता, असे त्यांनी स्पष्ट केले. अरोरा यांनी जय पवार, पार्थ पवार आणि सुरेंद्र पवार यांच्याशी संवाद साधल्याचे सांगितले.या भेटीदरम्यान, दोन राष्ट्रवादी गटांच्या संभाव्य विलिनीकरणाबद्दलही चर्चा झाली असल्याचे संकेत मिळाले आहेत. जि. प. निवडणुकांनंतर दोन्ही पक्ष एकत्र येतील, अशी चर्चा यापूर्वीही होती. मात्र, अरोरा यांनी ही चर्चा पक्षीय अंतर्गत असून योग्य वेळी सार्वजनिक केली जाईल, असे स्पष्ट केले. त्यांचे अजित पवार यांच्याशी असलेले नाते व्यावसायिकपेक्षा अधिक कौटुंबिक होते, असेही त्यांनी नमूद केले. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

### राज्याला महिलारुपी पहिली उपमुख्यमंत्री

**डामडौल न करता अत्यंत साधेपणाने होणार शपथविधी**

कुठलीही जय्यत तयारी न करता अत्यंत साधेपणाने हा शपथविधी घेतला जाईल. या शपथविधीनंतर सूनेत्रा पवारांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश होईल. यासह सुनेत्रा पवार यांच्या रुपाने राज्याला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मिळतील.


### राष्ट्रवादीच्या आमदारांची आज बैठक

राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांना आज शनिवार मुंबईत तातडीने बोलावण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या बैठकीत पक्षाची पुढील राजकीय दिशा, नेतृत्वाची जबाबदारी आणि विशेषतः उपमुख्यमंत्री पदाचा निर्णय यावर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत ही महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. आजच्या बैठकीत उपमुख्यमंत्री पदाबाबत एकमुखी निर्णय घेतला जाणार असल्याचीही माहिती समोर आली आहे.

## अजितदादा गेले निवडणुकीतील जोशही गेला! प्रचारात तिसऱ्या दिवशी 'अब शांत शांती'

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचे सावट तिसऱ्या दिवशीही राज्यातील १२ जिल्हा परिषदेच्या निवडणूक प्रचारात दिसून आले. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रचारात फटाके, ढोल ताशे, विरोधकांवरील टीकाटिप्पणी टाळल्याचे दिसून येत आहे. मतदानाला अवघे काही दिवस राहिले असतानाही अपघाताच्या घटनेमुळे प्रचारात मात्र जोश दिसेनासा झाला आहे. सगळीकडं प्रचाराची हवा नरम झाली आहे. अब शांती शांती असं वातावरण आहे.**




राजकीय वातावरणात एक प्रकारची शांतता आहे. नेहमी गजबजलेले चौक, सभांनी गाजणारी गावे आणि झेंड्यांनी सजलेले रस्ते सध्या तुलनेने शांत वाटू लागले आहेत. सकाळच्या सत्रातील प्रचार आज कमीच जाणवला. या निवडणुकांत विकासाचे प्रश्न, पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार अशा मूलभूत मुद्द्यांवर राजकीय लढत रंगते. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे जाहीर प्रचारावर मर्यादा आल्या आहेत.

अनेक ठिकाणी सभा होत आहेत. पण, फटाकेबाजी, ढोल-ताशांचे वाद्य टाळले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांमध्येच नव्हे तर इतर पक्षांमध्येही शोकाकुल वातावरण आहे. अजित पवार हे केवळ राज्यस्तरीय नेते नव्हते, तर पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणावर खोल प्रभाव टाकणारे नेतृत्व होते.

सहकार, साखर उद्योग, ग्रामविकास आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वच पक्षांसोबत त्यांचे आपुलकीचे नाते राहिले आहे. त्यामुळे त्यांच्या निधनाचा धक्का या निवडणुकीच्या रणधुमाळीवर थेट परिणाम करणारा ठरला आहे. दुसरीकडे, विरोधी पक्षांसमोरही एक नैतिक पेच निर्माण झाला आहे. आक्रमक प्रचार केल्यास संवेदनशीलतेचा अभाव असल्याचा संदेश जाऊ शकतो, याची जाणीव सर्वच पक्षांना आहे.

परिणामी, भाजप, काँग्रेस, शिंदेंची शिवसेना आणि ठाकरेंची शिवसेना यांचाही प्रचार तुलनेने संयमित झाला आहे. नेते कार्यकर्त्यांच्या बैठका घेत आहेत. मात्र, मोठ्या जाहीर सभांमध्ये टीका टाळली जात आहे. घरभेटी, शांत संवाद आणि संघटनात्मक तयारीवर भर दिला जात आहे.

निवडणूक जरी स्थानिक प्रश्नांवर आधारित असली, तरी राज्यातील या दुःखद घटनेचा भावनिक प्रभाव मतदारांच्या मनावर पडताना दिसतो. अंतिम टप्प्यात प्रचाराचा सूर कितपत बदलतो आणि मतदारांचा प्रतिसाद कसा राहतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




सध्या मी डाएटवर आहे !

| कल्याण |
|---|
| 146-12-778 |

| मुंबई |
|---|
| 339-57-557 |